Prof. Shriniwas Hemade, madshri@hotmail.com, 9226563052, http://shriniwashemade.yolasite.com/

**अभ्यासक्रम**



**भारतीय नैतिक विचारांमधील मुख्य संकल्पना**

ऋत, ऋण, धर्म, वर्णाश्रमधर्म, साधारणधर्म.

# Unit 5
# Ethics (Indian)
# घटक ५
# नीतिमीमांसा (भारतीय)

-----------------------------------------------------------------

## नीतिमीमांसा - तत्त्वज्ञानाची एक शाखा
## ( नीतिमीमांसेचे स्वरूप आणि नीतिमीमांसेच्या समस्या )

01

**प्रस्तावना :**

तत्त्वज्ञानाच्या पाच शाखांपैकी नीतिमीमांसा किंवा नीतिशास्त्र ही महत्वाची शाखा होय. नीतिची किंवा नैतिकता या संकल्पनेची चिकित्सा या ज्ञानशाखेत होते. नैतिक मूल्यांचे प्रशिक्षण देणारी ही ज्ञानशाखा आहे. नीतिमीमांसेचा मुख्य अभ्यास विषय म्हणजे नैतिक संकल्पनांचे विश्लेषण करणे होय (उदाहरणार्थ 'चांगले' - Good ही संकल्पना.). नीतिमीमांसेतील पाश्चात्य नीतिमीमांसा आणि भारतीय नीतिमीमांसा या दोन विचारप्रवाहांची ओळख आपण करुन घेणार आहोत. त्या आधी नीतिमीमांसा या शाखेचे आणि नीतिमीमांसा ज्या समस्येची चर्चा करते, त्या समस्येचे स्वरूप थोडक्यात पाहू :

## नीतिमीमांसा शाखेचे स्वरुप

आपण असे पाहिले की विश्व आणि मानवी ज्ञानाचे स्वरूप काय ? हा तत्त्वज्ञानातील एक मूलभूत प्रश्न आहे. दुसरा मूलभूत प्रश्न म्हणजे "माणसाने जगाव कसे ? चांगले जीवन किंवा शुभ जीवन जगणे म्हणजे काय? चांगल्या जीवनाचा आशय काय ? अशा शुभ जीवनाचा आकार कसा असतो ? कोणत्या गोष्टी मिळविल्या की जीवन 'शुभ जीवन' या दर्जाला प्राप्त होते? " म. जोतीराव फुले यांनी हीन आणि अशुभ जीवन जगणाऱ्या शूद्र आणि सर्व वर्णजातीधर्मातील स्त्रिया यांच्या जीवनाचे वर्णन करताना एक सूत्रबद्‌ध सारांश [1] सांगितला आहे.

***विद्येविना मती गेली***
***मतीविना नीति गेली***
***नीतिविना गति गेली***
***गतिविना शूद्र खचले***
***इतके अनर्थ एका अविद्येने केले***

या सारांशात व्यक्त केलेली नीतिची संकल्पना शूद्रांच्या जीवनाची हीन स्थिती सांगणारी आहे.फुले नीतिवर भर देतात आणि त्याचे कारणही देतात. ते कारण अविद्या, अज्ञान हे आहे. नैतिक जीवन जगताना कोणते ज्ञान आवश्यक आहे, याकडे निर्देश करतात. तथापि तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून नैतिक जीवन जगण्यासाठी

---

[1] म. जोतीराव फुले, ***शेतकऱ्याचा आसूड,*** 1883.

'नैतिकता' किंवा ' नीती' ही संकल्पना स्पष्ट होणे, नीतिचे ज्ञान होणे आवश्यक आहे. नैतिक वर्तन म्हणजे चांगल वर्तन असे समजले जाते. पण चांगले म्हणजे काय? हे मात्र स्पष्ट केलेले असतेच असे नाही.

## नीतिशास्त्रीय समस्या

आपण सगळे चांगले वागू इच्छितो. पण चांगले म्हणजे काय? त्याचे निकष कोणते? चांगुलपणाचे ज्ञान कसे होते? या समस्या आहेत. चांगले म्हणजे काय? हा एक नीतिशास्त्रीय समस्या आहे.या समस्येची चर्चा आणि चिकित्सा हा नीतिमीमांसेचा अभ्यासाचा विषय आहे.

कधी कधी चांगले म्हणजे काय ? हे कळत असूनही आपण वाईट का वागतो ? हा खूप मोठा नीतिशास्त्रीय प्रश्न आहे. उदाहरणार्थ, कुटुंबातल्या सुनेला , कुलवधूला,स्वतःच्या भावजयीला भरलोकांमध्ये निर्वस्त्र करावे का ? हा द्रौपदीचा प्रश्न आणि आजच्या भ्रष्टाचाराचा प्रश्न नैतिकच आहे.अशा प्रश्नांची उत्तरे मिळतात, असे नाही पण त्याची चर्चा करणे मात्र आवश्यक असते. त्यातून काही किमान मार्गदर्शन मिळू शकते . अशा प्रश्नांचा व चांगले या संकल्पनेचा संयुक्त अभ्यास करणारी शाखा म्हणजे नीतिमीमांसा होय.

समाजाच्या संदर्भात बोलताना, आपण असे म्हणू शकतो की चांगुलपणाचे ज्ञान झाले की व्यक्ती नक्कीच चांगली वागते का ? की चांगुलपणाचे ज्ञान नसतानाही चांगली वागते ? की चांगुलपणाचे ज्ञान नसतानाच ती चांगली वागते ? चांगले काय ? हे कळून देखील एखादी व्यक्ती वाईट का वागत असते ? अशा व्यक्तीला खरेच चांगले म्हणजे काय ? हे नक्की कळाले आहे का ?

प्रथम पुरुषी एक वचनी मी, माझ्या संदर्भात विचार करताना, मी असा विचार केला पाहिजे की, ''जग वाईट वागले तरी मी चांगले का वागावे ? चांगल्या वाईटातून मी चांगल्याची निवड का करावी ?'' हे सर्व प्रश्न अत्यंत गंभीर, गुंतागुंतीचे आणि थेट प्रश्न आहेत.

दैंनदिन जीवन जगतांना आपल्याला हे प्रश्न पडतात. पण या प्रश्नांची आपण कधीही गंभीर चर्चा करीत नाही. त्यामुळे ते बाजूला टाकले जातात आणि गृहीत धरले जातात. आणि त्यानंतर चांगल्या वाईटाचा सतत गोंधळ होऊन आपले व्यक्तिगत व सार्वजनिक जीवन गुंतागुंतीचे बनते. म्हणून या सर्व प्रश्नांची चर्चा आवश्यक आहे. अशा विविध नैतिक समस्यांची चर्चा करणारे शास्त्र म्हणजे 'नीतिमीमांसा' होय.

नीतिमत्ता हा केवळ माणसात आढळणारा गुणविशेष आहे.नीतिच्या आधारेच माणसाने समाज निर्मिती केली. साहित्य, संगीत, विविध कला, विज्ञान, धर्म, नाटय अशा गोष्टींनी सजलेली नटलेली, संस्कृती केवळ नैतिक जाणिवेमुळेच माणूस निर्माण करु शकतो. पण अशा भव्य दिव्य कृतीत युध्दाची, सत्तेची लालसा , अविश्वास , विविध प्रकारची हिंसा ही दुरिते सुध्दा आहेत.माणूस थोडयाश्या लाभासाठी दुर्वर्तनास तयार होतो म्हणूनच चांगल्या वाईटाचा प्रश्न निर्माण होतो.

## दुरिताचा अभ्यास

'चांगले' या पदास 'शिव' असाही शब्द आहे.'शिव' या संकल्पनेच्या विरोधी संकल्पना म्हणजे 'वाईट' किंवा 'दुरित' ही होय. शिवाचा विचार करताना दुरिताचाही विचार करावा लागतो. म्हणजेच दुरिताचा अभ्यास करणे म्हाणजेच शिवविचार पूर्ण करणे. त्यामुळे 'दुरिता' चाही अभ्यास नीतिमीमांसा करते.संत ज्ञानेश्वर महाराज '' दुरितांचे तिमिर जावो ा विश्व स्वधर्म सूर्ये पाहो'' म्हणतात, तेंव्हा ते तिमिराचा म्हणजे अंधाराचा, म्हणजे अज्ञानाचा विचार करतात. तो ज्ञानाचा अंधकार दूर झाला तरच दुरित म्हणजे वाईट नष्ट होईल, अशी ग्वाही देतात.

## लिंगभाव आधारित नीतिमीमांसा

विसाव्या शतकात समाजशास्त्र या विषयात 'लिंगभाव' या संकल्पनेचा अभ्यास होवू लागला. ''लिंगभाव म्हणजे ज्या लिंगाचे आपण असतो त्या शरीरानुसारचा भाव'' असे समजले जाते.म्हणजे माझे लिंग पुरषलिंग असेल तर माझ्या भावभावनाही पुरुषीच असतात, जर मी स्त्रीलिंगी असेन तर भावभावनाही स्त्रीलिंगीच असतात, असे

मानले जाते. तथापि शरीर एका लिंगाचे आणि भावभावना दुसऱ्या लिंगाच्या असू शकतात. म्हणजे मी पुरुष असूनही भावना स्त्रीलिंगी असू शकतात; किंवा मी स्त्री असून भावना पुल्लिंगी असू शकतात. भावनांनुसार शरीराकडून वर्तन होणे म्हणजे **लिंगभाव** होय.या लिंगभावाचा परिणाम नैतिकतेवर होतो.

याचा अर्थ असा की भारतीय आणि एकूण जागतिक कुटुंब रचना आणि समाज रचना पुरुषप्रधान आहे, असे लक्षात येईल. पुरुष हाच कुटुंबप्रमुख मानला जातो. कोणताही विचार करताना बहुधा पुरुषी दृष्टिकोनातून विचार केला जातो. पुरुष जे ठरवितो ती नैतिकता मानली जाते. स्त्रीलाही पुरुषांचे निकष लावले जातात आणि स्त्रीची नैतिकता ठरविली जाते. पुरुषाचे कोणतेही वर्तन नैतिक समजले जाते आणि स्त्रीचे वर्तन अनैतिक समजले जाते. उदाहरणार्थ कुटुंबातल्या सुनेला , कुलवधूला,स्वतःच्या भावजयीला भरलोकांमध्ये निर्वस्त्र करावे का ? हा द्रौपदीचा प्रश्न पुरुषी नैतिकतेसंबंधीचा प्रश्न आहे. तोच प्रश्न स्त्रीच्या दृष्टिकोनातून पाहिला तर त्या नैतिकतेचे स्वरुप बदलते. हा ही लिंगभावच आहे.

या लिंगभावाचाही नैतिक संकल्पनांवर परिणाम होतो. तो कसा होतो, त्याचे स्वरूप कसे असते ? लिंगभावाचा चांगुलपणाच्या संकल्पनेवर परिणाम होतो का ? होत असल्यास कोणता ? कसा ? का ? हा प्रश्न अलिकडील स्त्रीवादी दृष्टिकोनातून पुढे आला आहे.

## **व्युत्पत्ती** (Etymology):

'नीति' हा शब्द 'नी' या संस्कृत धातूपासून बनतो.'नी' म्हणजे नेणे , घेऊन जाणे अथवा वाहून नेणे .जी आपणास आयुष्याच्या मार्गावरून नेते,नेईल ती नीति.पर्यायाने 'जी आपणास जीवन जगण्यास मार्गदर्शन करते, चांगल्या जीवनाकडे घेऊन जाते,ती नीती. आयुष्य कसे ***न्यावे*** हे सांगते ती नीती होय. नीती ही आदर्श जीवनाची रीती आहे किंवा जीवनाची आदर्श रीती आहे [2]. या

इंग्रजीत नीतिला Ethics असा शब्द आहे. 'नीतिमीमांसा' हे Ethics चे भाषांतर होय. Ethics ला Moral Philosophy असाही पर्याय आहे. Ethics हा शब्द प्राचीन ग्रीक भाषेतील ethos या शब्दापासून बनतो. ethos म्हणजे सामाजिक चालीरिती, सामाजिक सर्वमान्य वर्तन. सर्वमान्य म्हणून चांगले, असे समीकरण त्या काळात असल्यामुळे Ethics म्हणजे चांगल्या वर्तनाचे शास्त्र अशी व्याख्या बनली. moras या लॅटिन भाषेतील शब्दापासून morality हा शब्द बनलो . moral म्हणजे लोकांची समाजातील समान वागण्याची पध्दती .त्यामुळे सर्व माणसाच्या समान वागण्याच्या नीतिनियमांना moral असे म्हणतात.Ethics, Morality, Moral Philosophy, नीतिमीमांसा हे सर्व शब्द परस्परांचे पर्याय किंवा भाषांतर म्हणून वापरले जातात. संस्कृतमध्ये 'नाीतिमीमांसा ' म्हंटले आहे. मीमांसा, परीक्षा, चिकित्सक हे एकाच अर्थाचे शब्द आहेत.

सर्व व्युत्पत्ती ***'चांगले वर्तन'*** या संकल्पनेवर भर देतात .त्यामुळेच त्यांच्यापासून बनणारे सर्व शब्द नैतिकताच स्पष्ट करतात. अशा तऱ्हेने नीतिशास्त्र 'चांगले' (Good ) या संकल्पनेची चर्चा करते. मुख्यतः ***चांगले म्हणजे काय ?*** हा नैतिक प्रश्न आहे. त्या आधारेच खरी तर नैतिक चर्चा होते.

## ***व्युत्पत्तीनुसार*** **'नीतिमीमांसा' ची** ***व्याख्या***

थोडक्यात व्युत्पत्तीनुसार शुभ जीवनाच्या स्वरूपाची व शुभ जीवनाच्या अटींची चर्चा करणारे शास्त्र म्हणजे नीतिमीमांसा होय. शुभ जीवनाचा मार्ग कोणता, ते जीवन कसे लाभेल, अशा शुभ जीवनाचा आकार कोणता, तो आकार व्यक्तिच्या व समाजाच्या जीवनाता कसा येईल, याविषयक अटींची चर्चा नीतिमीमांसा करते.

## **नीतिमीमांसेचा सामाजिक संदर्भ :**

Ethics, Morality, Moral Philosophy नीति या शब्दांचे अर्थ पाहता असे लक्षात येईल की , नीतीचा उगम ' समाजातच ' होत असतो. समाजाबाहेर रानावनात , जंगलात , कुठेही एकांतात राहणारी व्यक्ती कशीही

---

[2] श्रीनिवास दीक्षित, ***नीतिमीमांसा***, पान 01, महाराष्ट्र तत्त्वज्ञान - महाकोश मंडळ, प्रथमावृत्ती 1982, साधना प्रेस, पुणे 30

वागली तरी तिचे वर्तन चांगले किंवा वाईट असे काही कधीही नसते.चांगल्या वाईटाचा विचार नेहमी समाजसापेक्ष असतो.अगदी '' हम करे सो कायदा '' असे जरी एखादी व्यक्ती म्हणत असती तरी तो कायदा पाळण्यासाठी 'दुसरी' व्यक्ती लागते. ती व्यक्ती म्हणजेच समाज.आता समाजाचे नियम व्यक्तीला लागू होतातच.रूढी,संकेत,परंपरा,सण,उत्सव इत्यादींमधून समाजाची नीतिसंकल्पना स्पष्ट होत असते. म्हणून नीतिचा अर्थ व्यक्तीसापेक्ष न करता समाजसापेक्षच करावा लागतो.

चांगले-वाईट,योग्य-अयोग्य, उचित-अनुचित, कर्तव्य-अकर्तव्य, सद्‌गुण-दुर्गुण यासारख्या मूल्यात्मक संकल्पनांना आकार मिळतो तो मुख्यतः समाजातच. सामाजिक जीवन जगतानाच या सर्व मूल्यांना अर्थ प्राप्त होतो. सामाजिक संदर्भाच्या आधारे नैतिक मूल्यांचा विचार केला जातो.

**'नीतिमीमांसा' ची तात्त्विक व्याख्या**

थोडक्यात, **मानवी जीवनात उद्‌भवणाऱ्या नीतिविषयक समस्यांचे तात्त्विक विवेचन करणारे शास्त्र म्हणजे नीतिशास्त्र किंवा नीतिमीमांसा** होय.

नीतीचा संबंध एकीकडे व्यक्तीच्या खासगी चारित्र्याशी येतो, तर दुसरीकडे त्याच्या सामाजिक वातावरणाशी व पारंपरिक रीतिरिवाजांशी येत असतो.व्यक्तीचे व्यक्तिमत्व सामाजिक पार्श्वभूमिवरच घडत असे, पण सामान्य दृष्टिने रुढ झालेले रीतिरिवाज व्यक्तिला अवजड आणि निरर्थक वाटू लागले की नैतिक समस्या निर्माण होतात.आणि सामान्य नियम परिस्थितीवरच अवलंबून असल्याने परिस्थिती बदलली की नियम बदलतात, त्यावेळी व्यक्तिच्या समस्या सामाजिक समस्या बनतात.मग नव्या-जुन्याचा संघर्ष होतो. अशा वेळी या समस्यांची चर्चा करणे, चिकित्सा करणे आवश्यक ठरते. ती चिकित्सा नीतिमीमांसेत होते.

## नीतिशास्त्र किंवा नीतिमीमांसा

आपण येथे **नीतिशास्त्र** किंवा **नीतिमीमांसा** हे दोन शब्द वापरत आहेत. नीतिशास्त्र याचा अर्थ नीतिचे शास्त्र होय. 'शास्त्र' ही संस्कृत संज्ञा आहे. 'शास्' म्हणजे नियंत्रण आणणे, नियमन करणे किंवा नियम तयार करणे होय.नियम करणे याचा अर्थ व्यवस्था लावणे असा होतो. 'शास्' पासूनच शासन, प्रशासन असे शब्द बनतात.अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, भौतिकशास्त्र किंवा संगणकशास्त्र म्हणजे त्या त्या विषयाची व्यवस्था लावणे असते.म्हणून मानवी ज्ञानाची रचना करणे, त्याची व्यसस्था लावणे म्हणजे शास्त्र असते.या अर्थानुसार नीतिशास्त्र म्हणजे नीतिचे नियम तयार करणे, त्यांची व्यवस्था लावणे होय.

तथापि नीतिमीमांसा ही संज्ञा अधिक व्यापक आहे. तिच्यात 'शास्त्र' या शब्दात व्यक्त केलेल्या अर्थापेक्षा जास्त बौद्‌धिकता आहे. मीमांसा करणे म्हणजे विश्लेषण करणे, चिकित्सा करणे असते. संकल्पनांचे विश्लेषण करणे, त्या संकल्पनेचे घटक स्पष्ट करणे आणि त्या घटकांमधील परस्पर संबंध विशद करून सांगणे हे मीमांसेत अपेक्षित असते. विश्लेषण म्हणजे घटक आणि घटना यातील नातेसंबंध सांगणे होय. विश्लेषणास इंग्रजीत Analysis म्हणतात. संस्कृतमध्येही 'मीमांसा' ही संज्ञा याच Analysis च्या अर्थाने वापरली जाते.म्हणून येथे आपण नीतिमीमांसा असा शब्द वापरत आहोत. Analysis मध्ये संकल्पनांचे विश्लेषण अपेक्षित असते. ती तत्त्वचिंतनाची पद्‌धती आहे.[3]

---

[3] विश्लेषण म्हणजे पृथ्थकरण.एखादी वस्तु एकापेक्षा अधिक घटकांची,अवयवांची किंवा भागांची असू शकते.वस्तूंतील या तीन गोष्टीना वेगळे करण्याची प्रक्रिया म्हणजे विश्लेषण (Analysis) होय.[3] विश्लेषणामुळे त्या वस्तूचे ज्ञान होणे सोपे जाते.उदाहरणार्थ $H2O$ म्हणजे हैड्रोजनचे 2 अणू आणि ऑक्सिजनचा 1 अणू = पाणी. या प्रमाणे मनाचे विश्लेषण केले असता भावना,वासना,इच्छा,बुध्दि,विचार असे घटक आढळतात.असे विश्लेषण तत्त्वज्ञानात करणे म्हणजे ***'तात्त्विक विश्लेषण'*** होय. तात्त्विक विश्लेषण म्हणजे तत्त्वज्ञानात्मक दृष्टिने केलेले विश्लेषण.हे विश्लेषण मुख्यतः संकल्पनांचे आणि संकल्पना ज्या माध्यमाद्‌वारे मांडल्या जातात त्या भाषेचे असते.अवघड संकल्पना सोप्या संकल्पनांमध्ये स्पष्ट करणे,त्यांचा नेमका अर्थ लावणे,त्यातील विसंगती शोधणे हे तात्त्विक विश्लेषणाचे हेतू असतात.

**विश्लेषणाचे तीन घटक**

## भारतीय नीतिमीमांसा

भारतात सुध्दा नीतिविषयक अतिशय सखोल चिंतन झाले.पाश्चात्य नीतिशास्त्र आणि भारतीय नीतिशास्त्र यातील फरक असा की भारतीय नीतिमीमांसा ही 'भारतीय तत्त्वज्ञान' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या विविध प्रकारच्या वैचारिक प्रणालींमधून व्यक्त झालेले आहे आणि पाश्चात्य नीतिशास्त्र ही स्वतंत्र ज्ञानशाखा आहे. 'भारतीय नीतिमीमांसा' ही भारतातील वेगवेगळ्या धर्मांशी जोडली गेली आहे. कारण प्राचीन काळी भारतात धर्म आणि नीती ही क्षेत्रे वेगवेगळी नव्हती. त्यांना एकच समजले जात होते. म्हणजे व्यक्तिने धार्मिक असणे आणि नैतिक असणे हे एकच समजले जात होते. कोणताही धार्मिक माणूस नैतिक माणूस असतोच, असा समज प्राचीन भारतात होता आणि आजही तसे समजले जाते.भारतीय नीतिशास्त्र भारतीय धर्माच्या जवळपास अंकित असून धर्माच्या नावाखालीच ते विकसित झाले आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात नीतिशास्त्राला स्वतंत्र स्थान नाही, याचा अर्थ ते स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विकसित झालेले नाही. अर्थशास्त्र आणि कामशास्त्र हे जसे स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मानले गेले, तसे नीतिशास्त्र नव्हते. नीतिशास्त्र धर्माचे एक अविभाज्य अंग म्हणून स्वीकारण्यात आले.लोकमान्य टिळकांच्या मते तत्त्वज्ञान आणि नीति ही मूलतः 'धर्मा'चीच दोन अपरिहार्य अंगे आहत. पण 'धर्म' म्हणजे नीति व तत्त्वज्ञान यांची गोळाबेरिज नाही.

### भारतीय तत्वज्ञानाचे स्वरुप :

भारतीय तत्वज्ञानास 'दर्शन' असे म्हणण्याची पध्दत आहे. अशी एकूण ९ दर्शने आहे. या दर्शनाची विभागणी आस्तिक आणि नास्तिक अथवा वैदिक आणि अवैदिक अशी केलेली आहे. वेदांवर श्रध्दा ठेवणारे ते वैदीक व आणि श्रध्दा न ठेवणारे अवैदिक किंवा नास्तिक होय. चार्वाक , बौध्द,जैन ही तीन अवैदिक दर्शने आहेत . पूर्वमीमांसा - वेदांत, सांख्य - योग, न्याय - वैशेषिक ही वैदिक दर्शने आहेत.या सर्व दर्शनामध्ये परस्परांत मतभेद आहेत. पण तरीही सर्व दर्शनांमध्ये व्यापक पातळीवरील नैतिक चिंतन आहे. चांगले आचरण म्हणजे काय ? आदर्श जीवन म्हणजे काय ? या समस्येचा विचार सर्व दर्शनांमध्ये आढळतो.

भारतात मुख्यतः हिंदू वैदीक धर्म, बौद्‌ध आणि जैन धर्म असे तीन धर्म आहेत.यात शीख या धर्माची भर १५ व्या शतकात पडली. या पैकी प्राचीन काळापासून भारतात हिंदू वैदीक धर्म अधिक प्रभावी आहे. म्हणून भारतीय नैतिक विचार हा मुख्यतः वैदिक हिंदू धार्मिक विचार आहे, असे मानले जाते.अर्थात बौद्‌ध, जैन आणि शीख या धर्मांमध्येही नैतिक विचार स्वतंत्ररित्या मांडण्यात आला आहे.

या उलट पाश्चात्य नीतिशास्त्र धर्माच्या प्रभावाखाली कधीच नव्हते. व्यक्तिचे नैतिक जीवन व धार्मिक जीवन एकच मानले जात नव्हते. ते परस्परपूरक असू शकते, पण एकातून दुसरे निष्पन्न होते, असे मात्र कधीच नसते, याचे भान ग्रीक व पाश्चात्य विचारवंतांना होते. त्यामुळे पाश्चात्य तत्त्वज्ञानात नीतिशास्त्र स्वतंत्रपणे विकसित झाले. पाश्चात्य तत्त्वज्ञानात निरनिराळया तत्वज्ञांनी आणि विचारप्रणालींनी व्यक्तिच्या व समाजजीवनाचे निरनिराळे आदर्श किंवा ध्येये सूचित केली आहेत. उदाहरणार्थ, सुखवाद्यांनी सुख हे नैतिक ध्येय मानले तर बुद्‌धिवाद्यांनी व उपयुक्ततावाद्यांनी 'उपयुक्तता' हाच आदर्श मानला; तर कर्तव्यवादयांनी कर्तव्य हे मानवी जीवनाचे ध्येय मानले.

भारतीय तत्त्वज्ञानातील नैतिक विचार मात्र अशी विविध ध्येये मांडीत नाही,तर मानवी जीवनाचा एक निश्‍चित आराखडा मांडून ते त्याप्रमाणे एक अंतिम ध्येय ते सुचविते. ते ध्येय म्हणजे मुक्ती किंवा मोक्ष. जन्ममरण

1. ज्याचे विश्लेषण करावयाचे तो घटक (संकल्पना ) = विश्लेष्य (Analyzandum)
2. ज्या घटकांमध्ये किंवा संकल्पनांमध्ये विश्लेषण करावयाचे तो घटक = विश्लेषक. (Analysans)
3. विश्लेष्य आणि विश्लेषक यांच्यातील प्रक्रिया = विश्लेषण.(Analysis)

ही अनंत दुःखांची मालिका आहे. मानवी आत्मा जन्म घेऊन सुखदुःखांच्या चक्रात अडकून पडतो.त्यातून त्याची सुटका होणे कठीण असते.पण अशक्य नसते.या दुःख मालिकेतून सुटका म्हणजे मोक्ष आणि ' मोक्षासाठी व्यक्ती जे करते ते सर्व नैतिक ' अशी एक साधारण रुपरेखा भारतीय नीतिमीमांसा सांगते.

नैतिक समस्यांची चर्चा भारतीय परंपरेत पाश्चात्यांपेक्षा अधिक समृध्दीने भरलेली आहे. ग्रीक - पाश्चात्य परंपरा जास्तीत जास्त पावणेतीन हजार वर्षांची आहे. पण भारतीय परंपरा त्याही पेक्षा प्राचीन किमान सहा हजार वर्षांची असावी वेद, उपनिषदे, पुराणे महाकाव्य हे ग्रंथ तेवढे प्राचीन आहेत.महाभारत आणि रामायण ही दोन महाकाव्ये पाहाता असे दिसेल की महाभारत इ.स. पूर्व तीन हजार या काळात घडले असावे तर रामायण त्या पूर्वी हजारो वर्षांचे जुने मानले जाते. रामायणातील मुख्य विषय "आदर्श राजा कसा असावा, आदर्श पती कसा असावा,आदर्श पत्नी कशी असावी, आदर्श भाऊ, बहिणी,पिता, माता, प्रजाजन इ. कसे असावे ? हे आहेत. धर्म म्हणजे काय ? धर्म व नीती एकच आहे काय ? याची चर्चा महाभारतात आहे.

या दोन महाकाव्यांमध्ये ज्याची चर्चा होते ते प्रश्न नैतिक आणि तत्त्वज्ञानात्मक प्रश्न आहेत. व्यक्तीने कोणते कर्तव्य करावे ? ते करणे , कसे आवश्यक आहे याचे स्पष्टीकरण महाकाव्यांमध्ये मिळते. कर्तव्यासाठीच व्यक्तीने जगावे, हा संदेश भगवतगीता देते ,गीतेचा हा संदेश पाश्चात्य परंपरेतील कान्ट या तत्त्ववेत्त्याच्या 'कर्तव्यविषयक सिद्धांता' शी जुळतो असे लक्षात येईल.

*महाभारतात* (शांतिपर्व, अ. २५९) युधिष्ठिरांनी भीष्मांना प्रश्न विचारला आहे, की सर्व मानव, धर्म म्हणजे काय, या बाबतीत शंकाकुल झालेले असतात; म्हणून धर्म म्हणजे काय आणि तो कोणत्या प्रमाणांनी निश्चित करावयाचा, हे सुनिश्चितपणे सांगा. धर्म ऐहिक हिताकरता असतो की पारलौकिक हिताकरता असतो, की दोन्ही प्रकारच्या हितांकरिता असतो, यासंबंधी अत्यंत सुनिश्चितपणे काय ते सांगा. भीष्म सांगतात, ते असे : सदाचार, स्मृती, वेद ही धर्माची प्रमाणे होत. काही ज्ञानी लोक अर्थप्राप्ती ज्याने होते, तो धर्म होय असे म्हणतात. या जगात लोकजीवन नीट चालवण्याकरताच (लोकयात्रार्थमेव) धर्माचा नियम केलेला आहे. त्याच्या योगानेच ऐहिक आणि पारलौकिक सुख प्राप्त होते. हा धर्म कसा ओळखावा, याचे उत्तर भीष्म असे सांगतात : ज्या तऱ्हेचे वर्तन दुसऱ्या माणसाने आपल्याशी करू नये असे आपणास वाटते, त्या तऱ्हेचे वर्तन आपण दुसऱ्याशी करू नये. जे आपल्याला अप्रिय ते दुसऱ्यालाही अप्रिय होय. ज्याला स्वतःचे जीवित प्रिय आहे, त्याने दुसऱ्याचा घात का बरे करावा? जे जे आपणास हवे ते ते दुसऱ्यालाही मिळावयास पाहिजे, अशी वासना धरावी. *भगवद्गीतेत* याला 'आत्मौपम्य दृष्टी' असे म्हटले आहे. लोकमान्य टिळक यांनी *श्रीमद्भगवद्गीता* हे नीतिशास्त्र आहे असे म्हटले आहे व *श्रीमद्भगवद्गीतारहस्य* या त्यांच्या ग्रंथात *गीतेतील* अध्यात्मवादी नीतिशास्त्रच मुख्यतः विस्ताराने प्रातिपादिले आहे. 'आत्मौपम्य दृष्टी' हा त्यांनी या नीतिशास्त्राचा मूलभूत सिद्धांत सांगितला आहे.[4]

वैदिक हिंदु दर्शनांनी काही नैतिक सिद्धांत मान्य केलेले आहेत.त्यातील प्रमुख सिद्धांत पुढीलप्रमाणे :

**ऋत, ऋण, धर्म, वर्णाश्रमधर्म, साधारणधर्म.**

**ऋत :**

वेदकालात सुरचित नीतिशास्त्र अस्तित्वात नव्हते, पण नीतिविषयक विचार मांडलेले होते. 'ऋत' ही त्या विचारांपैकी एक संकल्पना आहे. सृष्टीच्या मुळाशी अस्तित्वात असलेल्या चेतनतत्त्वाचा आविष्कार म्हणजे 'ऋत', अशी मूळ संकल्पना आहे.'ऋत' ही तत्त्वज्ञानात्मकदृष्ट्या महत्वाची संकल्पना आहे. विश्वाची निर्मिती आणि सुव्यवस्था स्पष्ट करणारे म्हणून ते तात्त्विक सूत्र आहे. 'ऋत' ही संकल्पना बौद्ध दर्शनातील 'धम्म' या संकल्पनेशी

[4] जोशी, लक्ष्मणशास्त्री, नीतिशास्त्र : शेवटचा परिच्छेद, मराठी विश्वकोश.

जुळणारी आहे आणि 'झेंद अवेस्ता' या पारशी धर्माच्या पवित्र ग्रंथातही अशीच संकल्पना आढळते, असे मत ए. बी. कीथ [5] या विद्‌वानाचे मत आहे.

विश्वाची धारणा व पालनपोषण या 'ऋत' मुळे होत असते. 'ऋत' चा पहिला उल्लेख ऋग्वेद या पहिल्या संहितेत येतो.ऋग्वेद हा शब्दसुद्धा 'ऋत'पासूनच बनतो [6]. ऋग्वेदानंतर अथर्ववेद आणि भविष्यपुराण, भागवतपुराण, आणि इतर संहितांमध्ये 'ऋत' आणि त्याच बरोबर 'सत्य' या संकल्पनांचा उल्लेख आहे.

'ऋत'पासूनच 'ऋतम् ' हा शब्दही बनतो. त्याचा अर्थ स्वरमेळ, सामंजस्य, असा होतो. तो इंग्लीशमधील rythm या शब्दाशी जुळतो.मूळ ग्रीक (*rhythmos*) आणि लॅटीन भाषेतून आलेल्या rhythm अथवा *rhythmus* चा अर्थ ऋग्वेदातातील 'ऋतम्शी जुळतो. या सर्वांचा अर्थ स्वरमेळ, सामंजस्य, असाच होतो. 'ऋत'पासूनच अनेक शब्द आणि संकल्पना व देवता यांची नावे बनतात.[7] ती सर्व वैदिक वाङमयात आढळतात.

## **व्युत्पत्ती** (Etymology):

भाषाशास्त्रीयदृष्ट्या 'ऋत' हा शब्द युरो-भारतीय 'अर्' (म्हणजे बांधणे, जोडणे, एकत्र आणणे) या धातूपासून साधलेला आहे. 'अर्' चे साधर्म्य प्राचीन ग्रीक भाषेतील 'ईरेन' या संज्ञेशी आहे. 'ईरेन' याचा अर्थ सुद्धा 'जोडणे' असा होतो.

या संकल्पनेचे तीन अर्थ सुचविले गेले आहेत :

(1) ऋत म्हणजे सृष्टीतील विविध घटनांमागील नियामक तत्त्व (Cosmic Law).

(2) ऋत म्हणजे सत्य. म्हणून अनऋत (किंवा अनृत)म्हणजे असत्य.

(3)ऋत म्हणजे यज्ञविधी करण्यातील अचूकता.[8]

### (1) ऋत - नियामक तत्त्व (Cosmic Law).

हे विश्व कसेही बेताल व लहरी नसून ते विशिष्ट रीतीने आणि गतिने रचले गेले आहे. विश्वातील प्रत्येक घटना कोणत्या तरी नियमानुसारच घडते. सूर्य, चंद्र, तारे, ग्रहणे, पृथ्वीवरील उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू यांच्यात आणि प्राणिसृष्टीतील जन्म-मृत्यू इत्यादी घटनांमध्ये एक नियमबद्‌धता व लय आहे.संपूर्ण वस्तुजात म्हणजे हे सारे विश्व नियमबद्ध व नियत आहे. तेंव्हा यावर नियंत्रण ठेवणारी शक्ती कोणती ? तर ती म्हणजे 'ऋत' होय.विश्तातील ही नियमितता म्हणजे काहीएक प्रकारचा नैतिक सामंजस्य आणि नैतिक व्यवस्था आहे. या नियंत्रक शक्तीलाच विचारवंतांनी **'वैश्विक ऋत'** असे म्हंटले आहे.पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग ही विश्वाची सुव्यवस्थित रचना मानली गेली होती.त्यांच्या सुव्यवस्थापनासाठीच देवतांची निर्मिती झाली होती, असे हिरियण्णा मानतात[9].

या ऋताचे उल्लंघन कुणीही करू शकत नाहीत. ऋत-व्यवस्था कोणीही उल्लंघू शकत नाही, असे अथर्ववेदात एकेठिकाणी (18.1.5), तसेच सूर्य आणि सर्व समुद्र सुद्धा ऋत-व्यवस्थेचे पालन करतात (ऋग्वेद 1.105.12). देवांवरही ऋताचे बंधन असते. सूर्य, मित्र, सोम, वरुण, प्रजापती, मरुत्,यम,इंद्र यांनाही ऋताचे नियम बंधनकारक आहेत.किंबहुना देवदेवतांचा जन्मच ऋतामुळे होतो. त्यामुळे देवदेवतांना 'ऋतज' म्हंटले

---

[5] Arthur Berriedale Keith (1879–1944) a Scottish constitutional lawyer, scholar of Sanskrit and Indologist, Regius Professor of Sanskrit and Lecturer in Constitutional History in the University of Edinburgh.

[6] इतर शब्द : ऋत (ṛta), ऋतम् (ṛtam), ऋते (ṛte), ऋतानि (ṛtāni), ऋतेन (ṛtena), ऋताभ्याम् (ṛtābhyām), ऋतैः (ṛtaiḥ), ऋताय (ṛtāya), ऋतेभ्यः (ṛtebhyaḥ), ऋतात् (ṛtāt).

[7] http://www.etymonline.com/index.php?term=rhythm

[8] श्रीनिवास दीक्षित, भारतीय तत्त्वज्ञान, पान 48, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती 10, डिसेंबर 2010.

[9]. एम. हिरीयण्णा, भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास, अनुवाद : भा.ग. केतकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति 1973, पान 34-35.

आहे.ऋतनियमामुळे ज्यांचा जन्म होतो त्यांना 'ऋतज्' म्हणतात, नंतर ऋताचे ते पालन करतात म्हणून त्यांना 'ऋतप' आाणि ऋताच्या नियमाची वृद्धी करतात, म्हणून त्यांना 'ऋतावृध' असेही म्हंटले आहे. ज्याप्रमाणे मानवी समाजाता राजा, मंत्री, सचित यांची निर्मिती व योजना केली जाते तशी त्याप्रमाणे देवदेवतांची योजना होते, म्हणून देवदेवतांना 'ऋतज्' म्हंटले आहे.

वैदिक कालात प्रत्येक शक्तीची एक देवता असते, अशी कल्पना केली गेली. ती देवता त्या शक्तीला सामर्थ्य पुरविते, तिचे संरक्षण करते. ऋताची संरक्षक देवता म्हणजे ऋग्वेदातील वरुण देव होय. हा विश्वसम्राट असून वरुणाला 'ऋतावान' किंवा ' ऋतस्य गोपाः' म्हंटले आहे.

**(2) ऋत - सत्य**

या ऋताचे नियम माणसाने पाळणे म्हणजे त्याने नेहमी सत्यानेच वागणे असते. ऋत जणूकाही अपरिवर्तनीय आणि अनुल्लंघनीय असा निसर्ग नियम आहे. निसर्ग नियम ते कधीही असत्य नसतात; मानवी वर्तनही (तसेच असत्य नसणारे म्हणजे) सत्यच असावे, अशी कल्पना आहे. म्हणून ''ऋत म्हणजे सत्य'' आणि ''अनऋत म्हणजे असत्य'' [10] असे म्हंटले आहे. या अर्थाने ऋत ही ही शक्ति केवळ या विश्वाची चालक नाही तर माणसांमधील नीतीची व्यवस्था लावणारीही शक्ति आहे. नीतीचे आदेश देणारी आणि नीतीचे पालन करावयास लावणारी ती नीतीव्यवस्थाही आहे.

मानवाचे वैयक्तिक व सामाजिक कर्तव्य व सदाचरण यांच्या रुपाने ऋताचा आविष्कार म्हणजे धर्म (नैतिक कायदा व कर्तव्य ) होय. मानवी समाज व व्यक्ति या विश्वाचाच एक अंर्तनिहित भाग आहे (म्हणूनच आपण जे पिंडी ते ब्रह्माण्डी ' असे म्हणतो), त्यामुळे विश्वाचे नियमाक तत्त्व लघुरुपात व्यक्तिलाही लागू होते. याचा अर्थ विश्वातील सुव्यवस्था व सत्यता मानवी व्यक्ति आाणि सर्व मानवी समाजाला लागू होते. म्हणूनच व्यक्तिच्या बाबतीत 'ऋत' म्हणजे सत्य असे म्हंटले आहे.

**'ऋत' आणि सत्य**

.ऋत व सत्य या परस्परपूरक कल्पना आहेत.अथर्वशीर्षात असं सांगितलं आहे की, आपलं वर्तन ऋताधिष्ठित आणि सत्याधिष्ठित असावं. (ऋतम् वच्मि , सत्यम् वच्मि).जे वैश्विक नियमांशी ऋत म्हणजे ऋत आणि व्यावहारिक स्तरावर मानवी जीवनात सत्यवचनी असणे म्हणजे सत्य आहे. सत्य हे ऋताधिष्ठित म्हणजे सत्य ऋतावर अवलंबून असावे. ऋत मात्र सत्याधिष्ठित असेलच असं नाही. याचा अर्थ मानवी जीवनात काही वेळेस असत्य सुद्धा असते. ते ऋतावरअवलंबून नसते. माणूस स्वार्थासाठी असत्य वाचन करतो. सत्यवचन न पाळल्यास वरुण ही देवता आपल्या पाशांनी त्या मानवास शिक्षा करतो, असे वर्णन ऋग्वेदात आहे. वैदिक निघण् या शब्द्कोशानुसार आणि सायनाचार्य या विद्वान आचार्यांच्या मतानुसार 'ऋत' ला पर्यायी म्हणून 'सत्य' हा शब्द वापरला जातो. तरीही त्यात फरक आहे. ऋत म्हणजे मानसिक स्तरावरील सत्य आणि सत्य म्हणजे वाचिक स्तरावरील सत्य. वाचिक स्तर म्हणजे बोलणे. खोटेपणा किंवा खोटे बोलणे म्हणजे अनृत (अनऋत) होय.

**(3)ऋत - यज्ञविधीतील अचूकता**

यज्ञ संकल्पना वैदिक जीवनात महत्वाची आणि मूलभूत मानली आहे.यज्ञाला ऋताचेच एक रुप मानले आहे. प्रत्यक्षातील यज्ञ हे अदृश्य ऋताचे दृश्य स्वरूप मानले असून यज्ञ करण्याने ऋताला विश्वसंचालन आणि सुव्यस्थापन राखण्याचे बळ मिळते, असाही समज होता. म्हणून माणसाने यज्ञ केले पाहिजेत. ते ऋताचे आणि देवतांचे मानवावर असलेले ऋण आहे; ते फेडणे आवश्यक आहे.

---

[10] हा अर्थ वैदिक कालात नाही तर इराणी-भारतीय कालात कालात विकसित झाला असावा, असे एम. हिरीयण्णा नमूद करतात. एम. हिरीयण्णा,
"भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास", अनुवाद : भा.ग. केतकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति 1973, पान 23.

या अर्थाने यज्ञाला देवांचे देणे म्हणजे देवऋण मानले गेले आहेच, शिवाय माणसाला हवे ते मिळवून देण्याचे सामर्थ्य यज्ञा असते, असे समजले गेले होते. हे यज्ञ करताना जो विधि व कर्मकांडे करणे आवश्यक आहे. ती कर्मकांडे अचूक केली पाहिजेत, तरच यज्ञाचे फळ मिळते.त्यामुळे यज्ञविधीतील अचूकतेकडे लक्ष ठेवावे लागे. त्यासही ऋत म्हंटले आहे. कारण ऋत म्हणजे नियमितता आणि अचूकता असते.अर्थात यज्ञ करणे हा सर्वसामान्यजनांचा रिवाज नव्हता तर केवळ काही 'उच्चवर्णीय मंडळी' चा धर्म होता.[11]

### ऋत आणि कर्मसिद्धान्त

ऋताच्या संकल्पनेतूनच कर्मसिद्धान्त विकसित झाला.[12] कर्मसिद्धान्त ही ऋत संकल्पनेची विकसित अवस्था आहे[13], असा सिद्धान्त मांडला आहे. ऋत म्हणजे विश्वातील नियमबद्धता होय. याचा अर्थ निसर्गातील प्रत्येक घटना नियमानुसार घडते, प्रत्येक घटनेला कारण असते, असा होतो.' जसे कर्म तसे फळ' हा ऋताचा निसर्ग नियम मानला आहे, परिणामी 'चांगल्या कर्माचे फळ चांगलेच' आणि 'वाईट कर्माचे फळ वाईटच' , हा ही निसर्गनियमच बनतो. तो नियम म्हणजेच सृष्टीतील ऋतव्यवस्था असते. या वैश्विक ऋताला अनुसरुन प्रत्यक्ष जीवनात वागणे म्हणजे नीतिला अनुसरुन वागणे असते.म्हणूनच 'ऋत' ही संकल्पना जसे सृष्टीचे नियंत्रण करते, तसे ती मानवी जीवनाचे नियंत्रण करते किंवा मानवी वर्तन नैतिक कसे राहिल, कर्मानुसार फलप्राप्ती प्रत्येकाला मिळेल, असे सुचविते.[14]

चांगल्या कर्माचे फळ मला आता मिळाले नाही तरी नंतर का होईना मिळेलच, कारण 'कर्म तसे फळ' हा सृष्टीचा नियम आहे, ऋत ही शक्ती त्याचे नियमन करते.म्हणून मला इतर माणसांनी न्याय दिला नाही तरी ऋत आणि विश्वसम्राट वरुणदेव मला न्याय देतील, असा विश्वास माणूस बाळगतो. लोकमान्य टिळकांनी त्यामुळेच कदाचित ''मला इथे न्याय मिळाला नाही तरी तिथे न्याय मिळेल'' असे म्हंटले असावे. मृत्युनंतर शरीर नाश पावले तरी कर्म शिल्लक राहाते आणि त्यानुसार जन्म मिळतो असे बृहदारण्यकोपनिषद (3.2.13) छांदोग्योपनिषद (5.10.7) आणि याज्ञवल्क्य स्मृतीत म्हंटले आहे.

### एम. हिरियण्णा यांचे मत

हिरियण्णा [15] यांच्या मते, प्राचीन भारतीय धर्माची म्हणून वैदिक हिंदू धर्माची दोन वैशिष्ट्ये होती. पहिले, वैदिक कालात मित्र, सोम, वरुण, प्रजापती,मरुत्,इंद्र इत्यादी देवतांची कल्पना केली गेली. या देवतांचे निसर्गाशी साम्य मानले गेले. उदाहरणार्थ, अग्नि ही देवताही आहे आणि नैसर्गिक वस्तूही आहे. त्यामुळे अग्नि या नैसर्गिक वस्तूची देवता म्हणून अग्नि ही देवता मानली गेली. पावसाची देवता पर्जन्य, सूर्य हा मित्र इत्यादी. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे ऋत ही संकल्पना आहे.'ऋत' म्हणजे निसर्गातील नियमबद्धता किंवा दिवस-रात्र-दिवस यातील नियतक्रम होय. या ऋताचा उल्लेख ऋत-रक्षक (गोपा ऋतस्य), ऋताचरणी (ऋतायु) असा करण्यात येतो.ऋताचरणी म्हणजे ऋतानुसार वर्तन करणारा मानव. म्हणजे निसर्गनियम पाळणारा, तसे सत्याचरण करणारा.

सत्याचरण करणे याचा अर्थ नैतिक वर्तन करणे होय. देवता या विश्वातील शक्ति असून त्यांचे सामर्थ्य केवळ भौतिक विश्वापुरते नाही; तर नीतीच्या विश्वातही आहे. नैतिकतेचे नियमही या देवतांनी घालून दिलेले आहेत. हे नियम बदलता येत नाहीत आणि मोडताही येत नाहीत.त्यांच्या नजरेतून कोणतेही पाप सुटत नाही.याचाच अर्थ मानवाने ऋताचे नियम पाळणे बंधनकारक आहे.म्हणून ऋत म्हणजे नीती असे म्हंटले आहे.

---

[11] एम. हिरीयण्णा, "भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास ", अनुवाद : भा.ग. केतकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति 1973, पान 26.

[12] श्रीनिवास दीक्षित," भारतीय तत्त्वज्ञान", पान 48, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती 10, डिसेंबर 2010

[13] कर्मसिद्धान्त, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड 1 पान 149, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे 30, 1974

[14] नीतिशास्त्र, भारतीय तत्त्वज्ञान, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड 2 पान 216, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे 30, 1974

[15] एम. हिरीयण्णा, "भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास", अनुवाद : भा.ग. केतकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति 1973, पान 22-23.

2) **ऋण :**

दुसऱ्याचे घेतलेले त्यास परत करणे म्हणजे ऋणमुक्ती.त्यास परत करावयाचे धन ते ऋण. ही मुळात अर्थशास्त्रीय संकल्पना आहे. ऋण म्हणजे आजच्या भाषेत कर्ज. म्हणून ऋणमुक्ती म्हणजे कर्जमुक्ती होय. व्यक्तिजीवन व समाजजीवनात उधारी, हातउसणे घेणे, कर्ज घेणे ही अपरिहार्य आर्थिक घटना असते. तो व्यवहार असतो. माणसाचे वर्तन नैतिक असण्यामध्ये ऋण फेडणे महत्वाचे असते.ऋणाची देवघेव सचोटीने करणे ही नीती आणि नैतिकता असते.

कर्ज हा जसा व्यवहार आहे तशी नीति पाळणे हा ही व्यवहारच आहे. पण नीती व्यवहारात्मक आहे, याचा अर्थ रुढ अर्थाने व्यवहार म्हणजे भौतिक फायद्याकरिता केलेली कृती नव्हे; तर 'कर्म' या अर्थाने नीती हा व्यवहार आहे. नीतीचे पालन करणे ही कर्म करण्याची कृती आहे. म्हणूनच नीतीला धार्मिक अधिष्ठान देवून 'ऋण' कल्पना केली आहे. पूर्वकर्मानुसार लाभलेल्या वर्णाजन्माला अनुसरुन सर्व कर्मे केवळ कर्तव्य म्हणून केली तरच कर्माला नैतिकता लाभते, अशी कल्पना[16] केली गेली आहे. कर्ज ज्याप्रमाणे फेडले गेलेच पाहिजे, त्याप्रमाणे धार्मिक कर्मे अवश्यकर्तव्य म्हणून केली गेलीच पाहिजेत; हे दर्शविण्यासाठी ही ऋणकल्पना वेदात मांडली आहे.त्यामुळे ऋषि म्हणजे गुरुजन, देवदेवता आणि पितर म्हणजे पूर्वज - विद्यमान मातापिता यांच्यासह सर्वांना उद्देशून जी कर्मे करण्याचे जे आदेश वेदात आणि स्मृतीग्रंथांत सांगिलते आहेत, ते कर्तव्यबुद्धिने केलेच पाहिजे, अस मत वात्सायन [17] या न्याय दर्शनाच्या तत्त्ववेत्त्याने मांडले आहे.

ऋणमुक्ती हा कर्तव्याचाच भाग आहे. एवढेच नव्हे तर ते कर्तव्यच आहे. माणसाच्या एकूण कर्तव्यामध्ये कर्जफेडीचा समावेश असतो. धार्मिक अर्थाने ऋणमुक्ती न झाल्यास मोक्ष अथवा मुक्तीत अडथळा निर्माण होतो. अडथळा निर्माण करणे म्हणजे 'पाप' होय [18].मग पापमुक्तीसाठी पुन्हा जन्म घेणे अपरिहार्य असते, अशी कल्पना आहे.

या संकल्पनेला भारतीय समाजशास्त्रज्ञांनी आणि विचारवंतांनी वेगळा अधिक उच्च दर्जाचा नैतिक आधार दिला. तिला अधिक व्यापक बनविले. मनुष्य जन्माला येतो तेंव्हा काही ऋणे घेवूनच जन्माला येतो, अशी कल्पना 'ऐतरेय ब्राह्मण' या ग्रंथात मांडण्यात आली. ऋषिऋण, देवऋण, पितृऋण अशी तीन ऋणे प्रत्येकावर असतात.[19] 'ऋण' ही संकल्पना प्रथमतः 'मनुस्मृती' या वैदिक हिंदुधर्माच्या स्मृतिग्रंथात आढळते.[20].

1. **ऋषिऋण :** ज्ञानदान करणाऱ्या ऋषिमुनींचे विद्यार्थ्यावर खूप मोठे ऋण असते. ते त्याने वेदांचा अभ्यास करून व त्यांना दक्षिणा देवून फेडणे.म्हणजे विद्यार्जन आणि विद्यावर्धन करणे.
2. **देवऋण :** जीवनदान व जगण्याची साधने देणाऱ्या दैवीशक्ती / ईश्वराचे ऋण यज्ञयाग, पूजा, अर्चना करून फेडणे.
3. **पितृऋण :** पूर्वजांनी सर्व प्रकारच्या संकटांशी सामना करून आपले रक्षण,संवर्धन केले त्यांचे ऋण आपण स्वतः गृहस्थाश्रम स्वीकारून वंशविस्तार करून फेडणे. त्याचप्रमाणे श्राद्ध, पिण्डान इत्यादी मार्गाने त्यांना आदर दर्शविणे. पितृ = पालक / पितर.
4. **मनुष्यऋण :** मानवजात सहकार्याने अस्तित्वात राहाते. अतिथिचा सत्कार करणे, सामाजिक कर्तव्य करणे, कायद्याचे पालन करणे = एकमेका साह्य करू / अवघे धरू सुपंथ ! या ऋणाची भर वरील तीन ऋणांनंतर (पण प्राचीन काळीच) घालण्यात आली. 'शतपथ ब्राह्मण' (प्रा.1.7.2.1-6) या ऋणाचा उल्लेख येतो.

---

[16] नीतिशास्त्र, ***भारतीय तत्त्वज्ञान***, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड 2 पान 217, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे 30, 1974.

[17] धर्मतत्त्वज्ञान, न्यायमत, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड 1 पान 146, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे 30, 1974.

[18] नीतिशास्त्र, ***भारतीय तत्त्वज्ञान***, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, खंड 2 पान 215, मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे 30, 1974.

[19] श्रीनिवास दीक्षित," भारतीय तत्त्वज्ञान", पान 52-53 , फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती 10, डिसेंबर 2010

[20]मनुस्मृती अध्याय ६.३४ ते ३६ पान १४१, पण ४ सार्थ श्री मनुस्मृती, विष्णुशास्त्री बापट, राजेश प्रकाशन, २६ गिरीजा सोसायटी, एम. आय. टी रोड, पुणे ३८

ही ऋणे फेडण्यासाठी मनुष्य जीवनाची विभागणी चार आश्रमात केली गेली. ब्रह्मचार्यश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम. ब्रह्मचार्यश्रमात ऋषिऋण, गृहस्थाश्रमात पितृऋण व देवऋण आणि वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या दोन आश्रमात मनुष्यऋण फेडावे.अर्थात ही विभागणी काटेकोर अशीच असते, असे नव्हे; तर ब्रह्मचार्यश्रमातील ऋषिऋणासह सर्व ऋणे क्रमाक्रमाने जीवनभर फेडावयाची असतात.

**यज्ञ म्हणजे ऋण - देवऋण** [21]

प्राचीन भारतीयांच्या जीवनात यज्ञाला फार महत्व होते. माणसाला हवे ते मिळवून देण्याचे सामर्थ्य यज्ञा असते, असे समजले गेले होते. एवढेच नव्हे तर यज्ञ करणे हे ऋण फेडणे आहे, अशीही श्रद्धा होती. तीन ऋणांपैकी यज्ञ करणे हे पहिले ऋण मानले गेले होते.ऋषिऋण दुसरे आणि पितृऋण तिसरे असा क्रम प्राचीन काळी होता.मनुष्यऋणाची भर नंतर पडली आणि यज्ञऋणाची जागा देवऋणाने घेतली.यज्ञ म्हणजे मानवाला असलेले देवाचे ऋण फेडणे होय, अशी होती.म्हणूनच यज्ञाचे वर्णनच 'देवऋण' असे केले गेले आहे.

## 3) धर्म :

'धर्म' या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. त्यात सुप्रसिद्ध व अत्यंत रूढ अर्थ म्हणजे हिंदू धर्म, ख्रिस्ती धर्म असा शब्द प्रयोगांमधून व्यक्त होणारा अर्थ. माणूस आणि विश्व यावर नियंत्रण ठेवणारी एक अतिमानवी शक्ती आहे, तिच्यावर श्रद्धा ठेऊन तिच्या आज्ञा पाळणे म्हणजे धर्म असे साधारणपणे म्हणता येईल. 'धर्म' हे वृत्ती असून ती आपले जीवन व्यापून टाकते, असा समज आहे.

प्राचीन काळी धर्म हा शब्द 'विधी' या अर्थाने वापरला जात असावा.विधी म्हणजे विशिष्ट प्रकारचे कर्मकांड होय. प्राचीन भारतातील धर्म किंवा इतर देशातील कोणतीही धर्मकल्पना पाहाता 'संपूर्ण मानवी समाजाचे जीवन, मानवाचे कल्पनाविश्व आणि त्याच्या क्रिया, या सर्वांचे नियंत्रण करणारी एक परिपूर्ण सत्ता, एक अस्तित्व अथवा नियंत्रक तत्त्व ' हा धर्माचा समान अर्थ म्हणता येईल. या धर्मव्यवस्थेने दिलेल्या आज्ञांचे पालन करणे म्हणजे '**धर्मनिष्ठा** ' होय.

धर्म ह्या शब्दाचे अनेक अर्थ शब्दकोशात आढळतात. मुख्यतः धर्म हा शब्द आज्ञा, रूढी, कर्तव्य, अधिकार, न्याय, नीती, गुण, चांगली कृत्ये व कर्म ह्या अनेक अर्थांनी वापरला जातो. 'धर्मशास्त्र' हे विशेषनाम मुख्यतः हिंदू समाजाला जे नियम लागू होत, त्या नियमांचे शास्त्र अशा अर्थाने वापरले जाते. हिंदुधर्मशास्त्र हे मुख्यतः वेद, स्मृती आणि पुराणे ह्यांवर आधारलेले आहे. हिंदुधर्मशास्त्रावरील ग्रंथ इ. स. पू. सु. ६०० ते ३०० वर्षापासून प्रचलित झाले असावेत. ह्या ग्रंथांना 'धर्मसूत्र' वा स्मृती म्हणतात. सर्वांत जुने ग्रंथ *गौतम, आपस्तंब*, असे हिरण्यकेशी व बौधायन ह्यांचे आणि त्यानंतरचे वसिष्ठ आणि विष्णू ह्यांचे आहेत. स्मृतिकारांत मनू, याज्ञवल्क्य, पराशर, नारद, कात्यायन, बृहस्पती इ. प्रमाणभूत मानले जातात. ह्याशिवाय *महाभारत*, पुराणे आणि स्मृतिग्रंथांवरील भाष्यांनी, टीकांनी व धर्मनिबंधानी धर्मशास्त्र समृद्ध केले.[22]

## धर्म आणि नीती

स्मृती ग्रंथानुसार धर्म म्हणजे नीती असाही अर्थ केला गेला आहे. नीती हा शब्द 'णीञ्' या धातूला 'क्तिन्' प्रत्यय लावून बनविला जातो. 'णीञ्' म्हणजे प्राप्त करणे, मिळविणे.[23] म्हणून जे मिळवावयाचे, जे लाभते

---

[21] एम. हिरीयण्णा, "भारतीय तत्त्वज्ञानाचा इतिहास", अनुवाद : भा.ग. केतकर, पुणे विद्यापीठ प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ति 1973, पान 26-27 आणि पान 36.

[22] साठे, सत्यरंजन धर्मशास्त्र http://www.marathivishwakosh.in/khandas/khand8/index.php

[23] के. रा. जोशी, स्मृतीतील नीतिविषयक संकल्पना, परामर्श, खंड ३, अंक ४ फेब्रुवारी १९८२ पान ४१, पुणे विद्यापीठ, पुणे. जोशी यांनी दाखवून दिले आहे की "शब्द्कल्पद्रुमाने' नीयते संलभ्यन्ते उपयाद्यः ऐहिकामुष्मिकार्था वास्याम् अन्य व / नी + अधिकाराने व क्तिन्' म्हणजे जीच्याद्वारा ऐहिक व पारलौकिक कल्याण साधून देणाऱ्या उपायांचे ज्ञान होते ती नीती

ती नीती. 'णीञ्' म्हणजे प्रापणे[24] असे म्हंटले आहे. धर्म म्हणजे कर्तव्य असा अर्थ तर प्रचलित आहेच. या अर्थानुसारच 'मनुस्मृती' या ग्रंथात सर्व वर्णाची आणि जातीची, स्त्री-पुरुषाची कर्तव्ये सांगितली आहेत.

## 'धर्म' आणि 'Religion' यांची (Etymology):

## Religion

Religion हा शब्द Religio किंवा या *religionem* लॅटीन शब्दापासून बनतो.त्याचा मूळ धातू  releg असा असून 'एकत्र असणे किंवा बांधून ठेवणे, हा त्याचा अर्थ आहे, असे मत टॉम हार्पर आणि जोसेफ कॅम्पबेल या आधुनिक संशोधकांचे मत आहे. त्यांच्या मते, *ligare* म्हणजे बांधून ठेवणे ( "bind, connect") म्हणून *re* (again) + *ligare* म्हणजे पुन्हा एकत्र आणणे किंवा आणणारे तत्त्व (to reconnect).मध्ययुगीन धर्म तत्त्वज्ञ सेंट ऑगस्टीनने हा अर्थ प्रभावी केला असावा, असे ते म्हणतात.

Releg या धातूपासून *Religere* संज्ञा बनते. releg म्हणजे धरणे किंवा बंधून राहणे. अन्य उपपत्तीनुसार इंग्लीशमधील *Religion* चा अर्थ धर्म असा केला जात असला तरी मूळ लॅटिन *Religere* चा अर्थ सवयीनुसार काळजीपूर्वक पालन करणे.

सिसिरो[25] या प्राचीन इतिहास तज्ञाच्या मते *lego* शब्दाला हा *re* (again) प्रत्यय लागून हा *religio* शब्द बनतो. *lego* चा अर्थ "read" असा आहे. त्यामुळे *religio* चा अर्थ *re* (again) + *lego* ("read") म्हणजे वाचन करणे पर्यायाने ' काहीतरी निवडणे, कशासंबंधी तरी विचार करणे. त्यामुळे *religio* चा अर्थ "choose", "go over again" or "consider carefully". असा होतो.

**धर्म'**

धर्म = धारण करणारे तत्व. 'धृ' या धातूपासून 'धर्म' संज्ञा बनते. म्हणून समाज धारण करणारे (म्हणजेच वेगवेगळ्या लोकांना एकत्र आणून समाज निर्मिती करणारा एक व्यापक नियम)तत्त्व असा त्याचा अर्थ होतो. ऋग्वेदात धर्म हा शब्द पुल्लिंगी आणि 'धर्मन्' हा शब्द नपुसंकल्लिंगी असा दोन अर्थानी वापरला आहे. वेगवेगळ्या वैदिक ग्रंथांत 'धर्म' च्या विविध व्याख्या दिलेल्या आहेत.

(A) 'धारणात धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजा:
यत् स्यात् धारण संयुक्तं स धर्म इति निश्चयः

(महाभारत)

ज्यामुळे समाजाचे धारण केले जाते,किंवा प्रजेला जो धारण आणि पोषण करतो तो धर्म . इथे धारण शब्दाचा अर्थ धरून ठेवणे,जोडून ठेवणे,बांधून ठेवणे असा आहे.

(B) 'जगत स्थितिकारणम् प्राणिनां साक्षात अभ्युदयानि श्रेयस हेतुर्थ: स् धर्म: !'

---

होय, असे नीति शब्दाचे विवरण दिले आहे. ही नीतीची व्याख्या ज्यामुळे अभ्युदय आणि निःयस साध्य होतात – " यतो ऽभ्युदायनिःश्रेयससिद्धिः स धर्मः – या वैशेषिकसूत्रात नमूद केलेल्या धर्माच्या लक्षणाप्रमाणे आहे. अशा रीतीने धर्म व नीती हे पर्याय शब्द असल्यासारखे वाटते."

[24] प्रापणे म्हणजे मिळविणे, लाभणे, पोहोचविणे : पान ३३९ गीर्वाणकोश, संस्कृत-मराठी लघुकोश, ज. वि. ओक, आनंद लाटकर, पुणे ३० आवृत्ती ०१ ऑगस्ट २००२

[25] **Marcus Tullius Cicero,** 3 January 106 BC – 7 December 43 BC. Roman philosopher, politician, lawyer, orator, political theorist, consul and constitutionalist. He is widely considered one of Rome's greatest orators and prose stylists. http://en.wikipedia.org/wiki/Cicero.

(शंकराचार्य)

जगताची वा विशिष्ट समुदायाच्या स्थितीचे कारण आणि आणि सर्व प्राणीमात्रांच्या अभ्युदयासाठी धर्म आहे.स्थिती म्हणजे ढळू न देणे ,स्थिर ठेवणे ,मेंटेन करणे.

(C) 'यस्मातधारयते सर्व त्रैलोक्यं सचराचरम्'

जो संपूर्ण त्रैलोक्याला,चराचराला धारण करतो तो धर्म !

## लक्ष्मणशास्त्री जोशी[26] यांचे मत

निसर्गातीत, अत्यंत पवित्र, संपूर्ण मानवी भवितव्याशी संबद्ध, जीवन व विश्व अथवा निसर्ग यांची नियंत्रक अशा अलौकिक शक्तीवर (किंवा अशा शक्तींवर) माणसाची श्रद्धा असते; त्या शक्तीचा (वा शक्तींचा) स्वतःशी अनुकूल, पवित्र व घनिष्ठ संबंध स्थापित करणारी वैयक्तिक अथवा सामाजिक मनःप्रवृत्ती व त्यातून निघणारी आचरणाची पद्धती म्हणजे धर्म (रिलिजन) होय आणि त्या शक्तीशी (वा शक्तींशी) प्रतिकूल मनःप्रवृत्ती व आचरण म्हणजे अधर्म होय. सर्व उच्च धर्मांचे तीन महत्त्वाचे विषय सांगता येतात : (१) सत्याचा वा अस्तित्वाचा संपूर्ण अर्थ व त्यात जीवनाचे स्थान; अंतिम सत्य व ध्येय यांची एकरूपता. (२) जीवनाचे सत्यस्वरूप आणि जीवनाची धार्मिक परिणती किंवा रूपांतर. (३) जीवनाच्या उच्चतम उद्देशाचे साधन व जीवनातील अन्य उद्देशांची आणि त्या उद्देशांच्या साधनांची अंतिम उद्देशाशी आणि त्याच्या साधनांशी संगती घालणे आणि विसंगती टाळणे. विसंगती अपवित्र शक्तीशी संबंध आल्याने उत्पन्न होते.

## राष्ट्रसंत तुकडोजी[27] महाराजांचे मत

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भारतीय ग्रामविकासाची संहिता समजल्या जाणाऱ्या "ग्रामगीता" या ग्रंथात 'धर्म' या संकल्पनेचे स्वरूप थोडक्यात सांगितले असून धर्माचे नेमके उपयोजनही स्पष्ट केले आहे.

*देवें निर्माण केली क्षिती । प्रजा वाढवी प्रजापति । मानवसमाज राहाया सुस्थितीं । धर्म सकळां निवेदिला ॥१॥*
*' धर्म ' बोलावया शब्द एक । परि त्याचा विस्तार अलौकिक । लौकिक आणि पारमार्थिक । मिळोनिया ॥२॥*
*अनेक प्राणी जेथे राहती । त्या सर्वांची राहावी सुस्थिती । समान समाधानाची गति । त्यास धर्म म्हणावें ॥३॥*
*आत्मरूपाची धारणा । सर्वांठायी समभावना । विश्वकुटुंब ऐशा आचरणा । धर्म म्हणावे निश्चयें ॥४॥*
*आपुली साधावी उन्नति । सौख्य द्यावे इतरांप्रति । या उद्देशे जी जी संस्कृति । धर्म म्हणावे तिजलागी ॥५॥*
*परस्परांशी वागणूक । ज्यांत न्याय - नीति सम्यक । प्रत्येकांचे कर्तव्य चोख । धर्म ऐसें त्या नांव ॥६॥*

---

[26] जोशी, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश **धर्म** ही नोंद पहावी.
http://www.marathivishwakosh.in/khandas/khand8/index.php?option=com_content&view=article&id=9156&Itemid=2

[27] राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा जन्म २७ एप्रिल १९०९ आणि मृत्यु ११ ऑक्टोबर १९६८ रोजी झाला. त्यांचे मूळ नाव *माणिक बंडोजी इंगळे* होय. त्यांना आडकोजी महाराजांनी गुरूमंत्र दिला. तुकडोजी महाराजांनी *ग्रामगीता, अनुभव सागर भजनावली, सेवास्वधर्म, राष्ट्रीय भजनावली* इत्यादी ग्रंथांची रचना केली . त्यांनी आपले आयुष्य जातिभेद निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन यावर खर्ची घातले . तुकडोजी महाराजांनी १९३५ साली मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची स्थापना केली.
संदर्भ :
http://www.khapre.org/portal/url/mr/books/gramgita/index

प्राचीन भारतीय विचारविशात ' धर्म' या संज्ञेचे दोन अर्थ प्रचलित आहेत.

**एक :** नैतिक नियम. धर्म म्हणजे लोकांनी धारण करावा असे सामाजिक तत्त्व किंवा नियम.

**दोन :** या सामाजिक नियमांची भारतीय वर्णजातिव्यवस्थेनुसारची विभागणी म्हणजे वर्णाश्रमधर्म.

1. ब्राह्मण = ज्ञानसाधना.
2. क्षत्रिय = समाजरक्षण + राजकारण.
3. वैश्य = व्यापारउदिम इत्यादी.
4. शूद्र = या सर्वांची सेवा.

## वर्णाश्रमधर्म.

वर्णाश्रमधर्म म्हणजे काय ? हे समजावून घेण्यासाठी आपणास प्रथम वर्ण आणि आश्रम या संकल्पना समजावून घेतल्या पाहिजेत. 'वर्ण' ही खास भारतीय संकल्पना आहे. भारतीय समाजरचना मुख्यतः चार वर्ण, चार आश्रम आणि चार पुरुषार्थ, यांनी बनली आहे. यातील चार वर्ण आणि चार आश्रम यांचे गुण व कर्तव्ये म्हणजे **वर्णाश्रमधर्म** होय. भारतीय समाजव्यवस्था वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्था यांनी मिळून बनली आहे.म्हणजेच ती या दोन सामाजिक व्यवस्थांमध्ये विभागली गेली आहे.

## वर्णव्यवस्था :

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र होत. ब्राह्मण सर्वांत उच्च. त्याच्या खालोखाल क्षत्रिय. क्षत्रियाच्या खालोखाल वैश्य व वैश्याच्या खाली शुद्र, असा हा उच्चनीच भाव वैदिक हिंदू धर्मशास्त्राने गृहीत धरला आहे. या चार वर्णांचा समाज बनतो. त्यास **चातुर्वर्ण्य** म्हणतात. यात ब्राह्मण हा सर्वश्रेष्ठ मानला आहे. ब्राह्मण स्त्री-पुरूषांपासून जन्मतो तोच ब्राह्मण, क्षत्रिय स्त्री-पुरूषांपासून जन्मतो तोच क्षत्रिय, वैश्य हा वैश्य स्त्री-पुरूषापासून जन्मतो तोच वैश्य आणि शुद्र स्त्री-पुरूषांपासून जन्मलेला जन्मतो तोच शुद्र. हीच जातिव्यवस्था आहे. त्या त्या जातीची कर्तव्ये करणे हे त्या त्या जातीचे प्राण आहेत, असे *मनुस्मृती या ग्रंथात म्हंटले आहे.* ती प्रत्येकाने केलीच पाहिजेत, असे माहात्म्यही मनुस्मृतीत स्पष्ट रूपाने व्यक्त केले आहे.

ऋग्वेद या ग्रंथात 'पुरुषसूक्त' या नावाचे सूक्त आहे. त्यात 'आदिपुरुष ' या नावाची संकल्पना मांडली आहे. या पुरुषाचे वर्णन करताना मानवी समाज अस्तित्वात कसा आला ते सांगितले आहे. या आदी पुरुषाला एक बळी देण्यात आला. तो बळी दिल्यानंतर समाज निर्माण झाला. त्यावेळी चार वर्ण निर्माण झाले, असे म्हंटले आहे. ही व्यवस्था मूळ ऋग्वेद या संहितेत सांगितली आहे. (सुक्त १०.९०.१२). ते असे :

ब्राह्मणः अस्य मुखम् आसीत
बाहू इति राजन्य कृतः
ऊरू इति तत् अस्य यत् वैश्य
पदाभ्याम् शूद्रः अजायत

अर्थ : याचे मुख ब्राह्मण झाले, बाहू राजन्य (क्षत्रिय) बनविले, याच्या मांड्या त्या वैश्य होत, पायापासून शूद्र जन्माला आला.

## जातिव्यवस्था

अशी कल्पना प्रचलित आहे की वर्णव्यवस्थेत संकर म्हणजे मिसळण होऊन जातीव्यवस्था निर्माण झाली. ही मिसळण आधी विवाह बाह्य होती नंतर ती विवाहामान्य झाली. या विवाहाचे दोन प्रकार करण्यात आले. अनुलोम विवाह आणि प्रतिलोम विवाह. **अनुलोम संकर** म्हणजे उच्चवर्णाचा पुरुष व खालच्या वर्णाची स्त्री यांचा विवाह. **प्रतिलोम संकर** म्हणजे वरच्या वर्णाची स्त्री व खालच्या वर्णाचा पुरुष यांचा संभोग व निर्माण झालेली संतती होय.या चार वर्णांचा अनुलोम विवाहाने होणारा संकर निषिद्ध नाही. या चार वर्णांचा प्रतिलोम विवाह संकर निषिद्ध आहे. या अनुलोम-प्रतिलोम संकरांच्या योगाने भारतीय समाज बनला आहे.[28] क्षत्रिय पुरुषापासून ब्राह्मण स्त्रीच्या ठिकाणी निर्माण झालेली संतती 'सूत' जाती होय. वैश्यापासून निर्माण झालेली 'वैदेहक' जाती होय. ब्राह्मणीच्या ठिकाणी शूद्र पुरुषापासून जी संतती निर्माण होते, तिला 'चंडाल' म्हणतात. ती अत्यंत नीच व बहिष्कृत आहे, असे मानले जात होते. क्षत्रिय पुरुषापासून वैश्य स्त्रीच्या ठिकाणी जी संतती होते, तिला 'माहिष्य ' जाती म्हणतात. वैश्य पुरुषापासून शूद्र स्त्रीच्या ठिकाणी 'करणी' नामक जाती उत्पन्न होते. त्या करणीच्या ठिकाणी माहिष्य पुरुषापासून 'रथकार ' नामक जाती निर्माण होते, असे हिंदू धर्मशास्त्र, स्मृती ग्रंथ इत्यादीत सांगितले आहे.

## वर्णाची कर्तव्ये व अधिकार :

ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची धार्मिक कर्तव्य अध्ययन, यजन व दान ही होत. अध्यापन, यज्ञाचे पौरोहित्य व प्रतिग्रह (दक्षिणेच्या रूपात) यांचा अधिकार ब्राह्मणांनाच आहे. धनुर्विद्या व राज्यप्रशासन हे क्षत्रियाचे उपजीविकेचे साधन आणि व्यापार व कृषिकर्म हे वैश्यवर्णाचे आणि ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांची सेवा हे शूद्राचे कर्तव्य होय व तेच उपजीविकेचे साधन होय.

## चार आश्रम : आश्रमव्यवस्था

आश्रम या शब्दाची उत्पत्ती 'श्रम' या धातूपासून होते. उत्पत्तीनुसार 'आश्रम' या शब्दाचे दोन अर्थ होतात.

१) जेथे श्रम केले जातात ते ठिकाण म्हणजे आश्रम.
२) ज्या कार्यासाठी श्रम केले जातात तो ही आश्रम.

मनुष्याचा विकास व्हावा यासाठी चार आश्रमांचा चार पाय-या सांगितल्या आहेत.

ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम. संन्यास हे अंतिम ध्येय आहे . जन्मत: मनुष्य तीन ऋणे डोक्यावर घेऊन येतो, असे भारतीय संस्कृती सांगते. **ऋषिऋण, पितृऋण व देवऋण**. ही तीन ऋणे आपणांस फेडावयाची असतात. ब्रह्मचर्याश्रमात उत्कृष्ट ज्ञान संपादून आपण ऋषिऋण फेडावे, पुढे गृहस्थाश्रमात संतती निर्माण करुन तिचे नीट संवर्धन करुन आपण पितृऋण फेडावे, आणि वानप्रस्थ व संन्यास या दोन आश्रमांच्या द्वारा सर्व समाजाची सेवा करून आपण देवऋण फेडावे, असा समज आहे.

---

[28] वर्णभेद हा रक्ताचा म्हणजे रक्ताचा बीज भेद होय; अशी संकल्पना आहे. समान वर्णाच्या स्त्री-पुरुषांपासून समान वर्णाचीच संतती होते, हा समान वर्णाचा अत्यंत प्रशस्त मानला आहे. ब्राह्मण पुरुष आणि क्षत्रिय स्त्री यांच्यापासून 'मूर्धावसिक्तनामक' जाती निर्माण होते. ब्राह्मण पुरुष आणि वैश्य स्त्री यांच्यापासून ' अंबष्ठ ' या नावाची जाती निर्माण होते. ब्राह्मण पुरुष व शूद्र स्त्री यांच्या विवाहातून ' पारशव ' किंवा 'निषाद' नावाची जाती उत्पन्न होते. क्षत्रियापासून वैश्य स्त्रीच्या ठिकाणी ' माहिष्यनामक ' जाती निर्माण होते व शूद्र स्त्रीच्या ठिकाणी क्षत्रियापासून जी संतती होते, तिला ' उग्र ' जाती असे म्हणतात. वैश्य पुरुषापासून शूद्र स्त्रीच्या ठिकाणी जी संतती निर्माण होते, ती जाती ' करण ' होय. यास अनुलोम संकर म्हणतात. **जोशी, लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश**

## चार पुरुषार्थ

पुरुषार्थ ही खास वैदिक हिंदूंची संकल्पना आहे असे एकूण चार पुरुषार्थ आहेत. धर्म, अर्थ, काम व मोक्ष. मोक्ष हा अंतिम पुरुषार्थ असून तो प्रत्येकाने मिळविणे, हे त्याचे कर्तव्य आहे. त्या सर्वांना मिळून '**पुरुषार्थ सिध्दांत** ' म्हणतात. पुरुषार्थ सिध्दांत संत साधू यांच्यासाठी नाही. तो सर्व सामान्यांसाठी आहे कारण संत साधूसंतांकडून थेट मोक्षाकडे जाऊ शकतात पण सामान्य माणसे जाऊ शकत नाही. त्यामुळे पुरुषार्थ सिध्दांत हा सामान्यांसाठी आहे. माणसाचे आयुष्य साधारणपणे 100 वर्षाचे आही, असे हिंदू धर्म मानतो.त्याचे 4 समान भाग केले आहेत. त्यांनाच आश्रम म्हणतात. कोणत्या आश्रमात कोणता पुरुषार्थ मिळवावा ते निश्चित केलेले आहे त्याचा आराखडा पुढीलप्रमाणे. ः

| अ. नं. | वय | आश्रम | पुरुषार्थ |
|---|---|---|---|
| 1 | 1 - 25 | ब्रह्मचर्याश्रम | धर्म + शिक्षण |
| 2 | 26- 50 | गृहस्थाश्रम | अर्थ + काम |
| 3 | 51 -75 | वानप्रस्थाश्रम | ----------- |
| 4 | 76 -100 | संन्याशाश्रम | मोक्ष (निवृत्ती) |

अशा रीतीने भारतीय समाजरचनेचा तात्विक आकार ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र या उच्च-नीच चातुर्वर्ण्य व्यवस्थेत अनुभवास येतो.*मनुस्मृतीतील* ही समाजरचना म्हणजे चातुर्वर्ण्यव्यवस्था होय. धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे पुरुषार्थ आहेत. आणि ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम हे चार आश्रम आहेत.

## मनुस्मृतीतील धर्माची संकल्पना

'मनुस्मृती' या हिंदू वैदिक धर्माच्या वादग्रस्त ग्रंथात 'धर्म' ही संकल्पना विविध रीतींनी मांडली आहे. कर्म करणे हा प्राण्यांचा, विशेषतः माणसाचा स्वभाव आहे, असे स्पष्ट करून या ग्रंथात धर्म आणि अधर्म[29] यांना कर्म करण्याचे साधन म्हंटले आहे. ("कर्मणां च विवेकार्थ धर्माधर्मौ व्यवेचयत्" ). येथे धर्म व अधर्म म्हणजे कर्तव्य आणि अकर्तव्य असा अर्थ आहे.

या ग्रंथानुसार वर्णधर्म म्हणजे पाच प्रकारची वर्णानुसारची कर्तव्ये होय. (वैदिकेः कर्मभिः पुण्यै निर्षेकादिद्विर्जन्मनाम् / कार्यः शरीर संस्कारः पावनः प्रेत्य चेह च [30]). उपनयन (मुंज) हा वर्णधर्म, , भिक्षा, दंडग्रहण इत्यादी आश्रमधर्म, मुंजा नामक गवताचा कडदोरा करावा हा वर्णाश्रम धर्म, मूर्धाभिषीक्त- बेशुद्ध राजाचे प्रजापालन इत्यादी गौण धर्म व प्रायश्चित्त इत्यादी नैमित्तिक धर्म अशा पाच प्रकारचा भविष्य पुराणोक्त धर्म म्हणजे कर्तव्य सांगितले आहे. त्याचे मुख्य दोन प्रकार आहेत : **सामान्यधर्म आणि विशेषधर्म**. सामान्यधर्म म्हणजे सर्व वर्णाच्या स्त्री-पुरुषांना लागू असणारा समान नियम आणि विशेष धर्म म्हणजे केवळ त्या त्या वर्ण किंवा जातीसाठी असलेला नियम होय.

वर्णधर्म, आश्रमधर्म, जातिधर्म, कुलधर्म, देशधर्म, युगधर्म, स्त्रीधर्म हे विशेष धर्म आहेत.

**वर्णाश्रम धर्म**

[29]'मनुस्मृती अध्याय १. २५, पण ४ सार्थ श्री मनुस्मृती, विष्णुशास्त्री बापट, राजेश प्रकाशन, २६ गिरीजा सोसायटी, एम. आय. टी रोड, पुणे ३८

[30] 'मनुस्मृती अध्याय २. २५, पण ४ सार्थ श्री मनुस्मृती, विष्णुशास्त्री बापट, राजेश प्रकाशन, २६ गिरीजा सोसायटी, एम. आय. टी रोड, पुणे ३८

प्रत्येकाने वर्णानुसार आपापले कर्तव्य करणे हाच धर्म मानला आहे. हाच वर्णाश्रमधर्म आहे. तो अनादी अनंत काळापासून प्रचलित आहे म्हणून या 'वर्णाश्रम धर्माला' **सनातन धर्म** असे म्हणतात. सनातन' म्हणजे काय? ज्यात कधीच काही बदल झाला नाही, होत नाही व होणार नाही; जे आधीपासून जसेच्या तसेच अस्सल, त्याला `सनातन' असे म्हणतात. `सनातन-वर्ण-आश्रम-धर्म' याचा संधी होऊन, `सनातन वर्णाश्रम धर्म' असा शब्द बनतो. वर्णाश्रम हे भारतीय संस्कृतीचे प्रधान स्वरूप आहे.

ऋग्वेदानंतरच्या वाङमयात वर्णधर्मांना स्थिरता आली. मग चातुर्वर्ण्य हा जन्मावर अवलंबून नसून कर्मावर अवलंबून आहे, असे मांडण्यात आले. उदाहरणार्थ 'श्रीमद् भगवतगीता' या ग्रंथात व्यक्तीच्या स्वभावानुसार वर्णाची व्यावसायिक कर्मे होत गेली, त्याचे वर्णन आहे. (१८.४१-४४ ) चातुर्वर्ण्य हे गुणकर्म यावर ठरते असे नोंदविले आहे (चातुर्वण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः ४.१३) असे म्हंटले आहे. काही काळ ही संकल्पना आणि त्यानुसारचा समाज लवचिक होता.

तथापि कालांतराने मात्र त्यात ताठरता आली आणि वर्ण व जात केवळ जन्मावर ठरू लागली. गुणकर्म बाजूला पडले. परिणामी हिंदू समाजात कटुता-वैमनस्य निर्माण झाले, वर्ण-जातीव्यवस्था ही शोषणाची आणि विषमतेची साधने बनली. एवढेच नव्हे तर स्त्रीचे वर्गीकरण सुद्धा शूद्रातिशूद्र असे करण्यात आले. यात चारही वर्णाच्या स्त्रियांचा समावेश करण्यात आला. स्त्रीचे वस्तूकरण झालेच पण सतीप्रथाही सुरु झाली.

या व्यवस्थेला थेट १९ व्या आणि २० व्या शतकातच फुले, वि. रा. शिंदे, राजर्षि शाहू, बाबासाहेब आंबेडकर यांनी आव्हान दिले.

**साधारण धर्म**

वर्णाश्रमधर्माखेरीज साधारण धर्म किंवा सामान्य धर्म ही संकल्पना भारतीय विचारविश्वात मांडली गेली आहे. वर्णाश्रमधर्मात वर्णानुसार प्रत्येकाने आपले कर्तव्य करावे, ते निष्काम बुद्धीने करावे, अशी अपेक्षा आहे. वर्ण अथवा जात किंवा लिंगनिरपेक्षपणे व्यक्तिने करावयाची कर्तव्ये किंवा कामे अथवा अंगी बाळगावयाचे सद्गुण म्हणजे **साधारण धर्म** होय. यास **'सार्वत्रिक धर्म'** असेही म्हंटले आहे.

मनुस्मृती[31] या स्मृतीग्रंथानुसार "सर्वांना लागू असलेले नियम अथवा सद्गुण म्हणजे **साधारणधर्म** होय. आश्रमधर्म, वर्णधर्म, देशजातिधर्म, कुलधर्म, राजधर्म या सगळयांची कसोटी म्हणजे सार्वत्रिक किंवा साधारण धर्म होय.

---

[31]जोशी, लक्ष्मणशास्त्री, **मनुस्मृति, :** धर्मशास्त्राचा एक मुख्य प्रमाणभूत ग्रंथ. याला मनुसंहिता किंवा **मानवधर्मशास्त्र** असेही म्हणतात. हा ग्रंथ अंदाजे इ. स. पु. दुसऱ्या शतकात लिहिला गेला असावा. त्यात चातुर्वण्य आणि स्त्री दास्याचे समर्थन केलेले आहे. तथापि इंग्रजांच्या आगमनानंतर भारतात हिंदू समाजात समाजसुधारणेचे व धर्मसुधारणेचे आंदोलन सुरू होऊन १५० हून अधिक वर्षे झाली. मनुस्मृतीतील किंवा एकंदरीत हिंदुधर्मशास्त्रातील विधिनिषेध किंवा धर्मनियम हे समाज सुधारणेच्या आणि धर्मसुधारणेच्या विरोधी असल्यामुळे रूढिनिष्ठ जनता व समाजसुधारक ह्यांच्यात संघर्ष सुरू झाला. प्रथम समाजसुधारणेस अनुकूल असलेली धर्मशास्त्रातील वचने हुडकून काढून समाजसुधारक स्वतःच्या सुधारणेच्या कार्यक्रमाचे समर्थन करू लागले. परंतु रूढीनिष्ठांची धर्मशास्त्राविषयक बाजू खूप बळकट असल्यामुळे समाजसुधारणेची चळवळ जेव्हा दृढमूल होऊ लागली आणि पसरू लागली तेव्हा मनुस्मृती व धर्मशास्त्र ह्यांच्याविरूध्द जाणारा जहाल समाजसुधारकांचा वर्ग पुढे आला. अस्पृश्यतानिवारणाच्या संदर्भात अस्पृश्य समाजातून सुधारक नेतृत्व वर आले. उदा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी प्रतीकात्मक कृती म्हणून मनुस्मृती जाळण्याचा कार्यक्रम अनेकदा पार पाडला. मनुस्मृतीमध्ये स्त्री-पुरूषनियमन,स्त्रियांचे पारतंत्र्य आणि जातिबध्द विषम समाजरचना ह्यांचे जोरदार समर्थन आहे. ब्राम्हण जात सर्वश्रेष्ठ व अस्पृश्य जमात ही सर्वात कनिष्ठ, बहिष्कार्य आणि सर्वसामान्य उच्चवर्णीयांच्या किंवा सवर्णांच्या वसतिस्थानांपासून दूर, अलग राहण्यास पात्र होय असे मनुस्मृतीमध्ये सांगितले आहे. म्हणून मनुस्मृतीच्या आणि परंपरागत धर्मशास्त्राच्या विरूध्द आजचे हिंदुसमाजसुधारक वारंवार लिहितात व प्रचार करतात.

धृतिः क्षमा दमो ऽ स्तेयं शौच शौचमिन्द्रीयनिग्रह
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्म लक्षणम्  (मनु. ६.९२)

म्हणजे "धैर्य, क्षमा, दम (संयम), चौर्याभाव (चोरी न करणे), शौच (पावित्र्य), इंद्रियनिग्रह, धी (मनाचा उदारपणा), विद्या, सत्य आणि अक्रोध हे साधारण धर्म होय". यांना *'सामान्य धर्म'* असेही नाव आहे. या साधारण धर्माचा उल्लेख पुन्हा दहाव्या अध्यायात करण्यात आला आहे.

अहिंसा सत्यमस्तेयं शौचमिन्द्रीयनिग्रह
एत सामासिक धर्मं चातुर्वर्ण्ये ऽ ब्रवीन्मनुः   (मनु. १०.६३ )

म्हणजे कोणाची हिंसा न करणे , यथार्थ भाषण करणे, अन्यायाने परधन न घेणे, मृत्तिका व जल यांच्या साह्याने शरीर शुद्ध करणे, इंद्रिय संयम करणे, हा धर्म सर्व वर्णीय लोकांसाठी आहे. यास सार्वत्रिक धर्म असेही म्हटले आहे. हे दहा नियम आहेत, म्हणून यांना दशविध धर्म असेही नाव आहे.

योग आणि इतर दर्शनांमध्ये ज्यांचा उल्लेख यम आणि नियम म्हणून केला जातो, त्यांनाच 'सामान्य धर्म' असे म्हंटले आहे

साधारण धर्म ही संकल्पना 'विशेष धर्म' या संकल्पनेच्या विरोधी आहे. विशेष धर्म हा वर्णाश्रम धर्म होय.

http://marathivishwakosh.in/khandas/khand12/index.php?option=com_content&view=article&id=10360